# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./आयसीडी/२०१९-२०/२
दिनांक ५ एप्रिल, २०१९

परिपत्रक

विद्यापीठाच्या विभागाचे विभागप्रमुख ,संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक, स्वायत्त संस्था/महाविद्यालये, संचलित महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षण संस्थाचे अध्यक्ष /सचिव, यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाला शासनास व विविध प्राधिकरणांस आवश्यक असलेली माहिती वेळोवेळी तयार करावी लागते. त्यासाठी सांख्यिकी कक्षाने Students on Roll हा ऑनलाईन प्रोग्राम तयार केलेला आहे. येथे संबधित माहिती ऑनलाईन स्वरूपी संकलित केली जाते. त्याकरिता परिपत्रके, स्मरणपत्रके, ईमेल तसेच दूरध्वनी/भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधून माहिती संकलित केली जाते. परंतु काही विद्यापीठ विभाग/संलग्नित महाविद्यालये/संस्था सदरची अपेक्षित माहिती विहित वेळेत सादर करीत नसल्याने शासनाने तीव्र नाराजी व्यक्त केली असुन सबंधीत विभागाचे /महाविद्यालयाचे आर्थिक सहाय्य स्थगित करण्याबाबत कारवाई का करू नये अशी विचारणा केली आहे.

सदर बाब विद्यापीठाने मा. कुलगुरूंच्या निदर्शनास आणली असता मा. कुलगुरूंनी विद्यापीठ विभाग /महाविद्यालये /संस्था यांची विविध प्रशासकिय विभागांशी सबंधित असलेली कामे करताना सांख्यिकी कक्षाकडुन 'ना हरकत प्रमाणपत्र' प्राप्त झाल्याशिवाय स्विकारू नयेत, असे आदेश दिले आहेत. (परिपत्रक क्र.UDSTAT/ICD/2018-19/165 of 2019 दिनांक २२ मार्च,२०१९ संलग्न).

सदर आदेशानुसार सर्व संबधीतांना कळविण्यात येते की, या विभागाकडे कोणताही प्रस्ताव पाठवतांना सांख्यिकी कक्ष, खोली नं. २०२, दुसरा मजला, मुंबई विद्यापीठ यांचे 'ना हरकत प्रमाणपत्र' सादर करावे.

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

विद्यापीठाच्या विभागाचे विभागप्रमुख ,संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थाचे संचालक, स्वायत्त संस्था/महाविद्यालये, संचलित महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षण संस्थाचे अध्यक्ष /सचिव.

दुरध्वनी क्र. ०२२-२२७० ८७३८
०२२-२२६१ ८९८७
Email : supt.statunit@gmail.com

# मुंबई विद्यापीठ

सांख्यिकी कक्ष
खोली क्र २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई - ४०० ०३२.

**No. UDSTAT/ICD/2018-19/ 165 of 2019**

दिनांक : २२ मार्च, २०१९

प्रति,

**१) संचालक,**
परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८.

**२) उपकुलसचिव,**
संलग्नता व मान्यता विभाग,
फोर्ट, मुंबई-४०० ०३२.

**३) उपकुलसचिव,**
शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग,
फोर्ट, मुंबई-४०० ०३२.

**४) उपकुलसचिव,**
विशेष कक्ष,
फोर्ट, मुंबई-४०० ०३२.

**५) उपकुलसचिव,**
नाव नोंदणी विभाग,
डॉ. आंबेडकर भवन,
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८.

**६) उपकुलसचिव,**
पदवीपूर्व/पदव्युत्तर विभाग,
फोर्ट, मुंबई-४०० ०३२.

मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली, यांच्यामार्फत दरवर्षी देशातील सर्व विद्यापीठाकडून विविध स्वरूपाची माहिती ऑनलाईन मागविण्याकरीता AISHE (All India Survey on Higher Education ) Programme तयार केलेला आहे. तसेच संचालक, उच्च शिक्षणं संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी देखील MIS (Management Information System) ऑनलाईन प्रोग्राम तयार केलेला असून सर्व विद्यापीठातील विभाग, संलग्नित महाविद्यालये/संस्था यांना माहिती भरणे अनिवार्य आहे.

तसेच विद्यापीठाला शासनास व विविध प्राधिकरणांस आवश्यक असलेली माहिती वेळोवेळी तयार करावी लागते. त्यासाठी सांख्यिकी कक्षाने Students on Roll हा ऑनलाईन प्रोग्राम तयार केलेला असून सर्व विद्यापीठ विभाग, संलग्नित महाविद्यालये/संस्था यांच्याकडून संचालकांच्या आदेशानुसार माहिती ऑनलाईन स्वरूपी संकलित केली जाते. त्याकरीता परिपत्रके, स्मरणपत्रके, ईमेल तसेच दुरध्वनी/भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधून माहिती संकलित केली जाते.

-१-

# मुंबई विद्यापीठ



परंतु अनेक विद्यापीठ विभाग, संलग्नित महाविद्यालये/संस्था सदरची अपेक्षित माहिती विहित वेळेत सादर करत नसल्यामुळे शासनाच्या वरीष्ठ अधिका-यांनी तीव्र नाराजी व्यक्त केलेली असून संबंधित अर्थिक सहाय्य स्थगित करण्याबाबत कार्यवाही का करू नये ? अशी विचारणा करण्यात आलेली आहे.

सदर बाब सांख्यिकी कक्षाने टिपणीद्वारे मा. कलगुरूंच्या निदर्शनास आणल्यामुळे कुलगुरूंनी सदर विद्यापीठ विभाग, महाविद्यालये/संस्था यांनी माहिती सादर न केल्यास **विद्यापीठ विभाग व महाविद्यालये/संस्था यांची आपल्या विभागाशी संबंधित असलेली कामे** सांख्यिकी कक्षाकडून ना-हरकत पत्र प्राप्त झाल्याशिवाय स्विकारू नयेत, अशाप्रकारचे आदेश दिलेले आहेत.

तरी सदर बाब लक्षात घेता, प्रत्येक चालू शैक्षणिक वर्षाकरीता आपल्या विभागाने याची नोंद घेवून सोबत असलेल्या ना-हरकत पत्र असल्याशिवाय **विद्यापीठ विभाग व महाविद्यालये/संस्था यांची आपल्या विभागाशी संबंधित असलेली कामे करू नयेत व त्याबाबत विद्यापीठ विभाग व महाविद्यालये/संस्था यांना परिपत्रकाद्वारे कळविण्याची व्यवस्था करावी** व त्याचप्रमाणे परिपत्रकाची एक प्रत सांख्यिकी कक्षाकडे पाठविण्याची व्यवस्था करावी.

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

सोबत :- प्रमाणपत्र/हमीपत्र

सांख्यिकी कक्ष, फोर्ट
खोली क्र. २०२

## AISHE & Students on Roll
## प्रमाणपत्र/हमीपत्र
## शै. व. २०१८-१९

दिनांक :

असे प्रमाणित करण्यात येते की, आपण दिलेल्या प्र-पत्राच्या वहित नमुन्या प्रमाणे संकलित केलेली माहिती रकान्यानुसार खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | विषय व संकेतस्थळ | परिपत्रक क्रमांक | माहिती भरली आहे / नाही | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | विद्यार्थी संख्या माहिती (Students on Roll) शै. व. २०१८-१९ www.eoffice.mu.ac.in/statistical | No.UDSTAT/ICD/2018-19/**92** of 2018, Dt. 15th October, 2018 | | रकान्यात नमूद केलेले सर्व संबंधित ऑनलाईन माहिती विषयीची शै. व. २०१६-१७ व २०१७-१८ बाबतचे सदर कक्षातील प्राप्त झालेले हमीपत्र/प्रमाण पत्राची प्रत सोबत पडताळणीसाठी घेऊन येणे. (त्याचप्रमाणे शै. व. २०१८-१९ संबंधित प्रमाणपत्राच्या **मुळ दोन प्रती** सोबत घेऊन येणे.) |
| २. | अखिल भारतीय उच्च शिक्षण संस्था (AISHE) शै. व. २०१८-१९ www.aishe.gov.in | No.UDSTAT/ICD/2018-19/**107** of 2018, Dt.7th December, 2018 | | |
| ३. | व्यवस्थापकीय माहिती पद्धत शै. व. २०१८-१९ (MIS) dhemis.maharashtra.gov.in | No.UDSTAT/ICD/MIS/2018-19/**82** of 2018, Dt.3rd October, 2018 | शै. व. २०१८-१९ या वर्षासाठी घेतलेल्या प्रमाणपत्राची एक छायांकित प्रत सोबत पडताळणीसाठी घेऊन येणे. | |

उपरोक्त रकान्यानुसार दर्शविल्याप्रमाणे पोर्टलवर भरलेली अत्यावश्यक माहिती परीपूर्ण व अचूक आहे. संबंधित माहितीमध्ये काही त्रुटी आढळल्यास महाविद्यालयाचा/संस्थेचा प्राचार्य/प्रमुख या नात्याने मी सर्वस्वी जबाबदार राहीन, याची मी ग्वाही देतो/देते.

Contact:-_______________

Email Address:-______________________________

संचालक/विभाग प्रमुख/प्राचार्य
(नाव, सही व शिक्का)

.............................................................................................................

## कार्यालयीन कामकाजाकरीता

________________________________________________

________________________________________ महाविद्यालयाची AISHE, MIS व STUDENT ON ROLL शैक्षणिक वर्ष **२०१८-१९** या वर्षाची माहिती सांख्यिकी कक्षाकडे प्राप्त झालेली असून सदर महाविद्यालयांचा **परिक्षा अर्ज/नोंदणी अर्ज, महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extention)/प्राचार्य/शिक्षकमान्यता (Approval)** स्विकारण्यास तसेच **जाहिरातमुसदा व बिंदूनामावली** तपासण्यास हरकत नाही.

नोडल अधिकारी,
(AISHE/MIS Cell)